Historicity Research Journal
Volume 1 | Issue 4 | Dec 2014 ISSN:- 2393-8900

Research Article

स्वातंत्र्य सेनानी माधवराव गोटू पाटील यांचे जळगाव जिल्हयाच्या स्वातंत्र्य चळवळीतील यो□दा-न

दिनेश रामदास महाजन

इतिहास विभाग प्रमुख,□ला व विज्ञा-न महाविद्यालय, भालोद जि.जळगाव

सारांश :

भारताच्या स्वातंत्र चळवळीच्या इतिहासात हजारो क्रांतीकारकांनी आपल्या सर्वस्वाचा त्याग करून या भारत भूमीला □ुलामगीरीतून मूक्त करण्यासाठी प्रार्णाप□ □ले.भारताची स्वातंत्र्य चळवळ जगात एक आगळी वेगळी व अविस्मरणीय घटना म्हणून ओळखली जाते.भारतातल्या हजारो क्रांतीकारकांप्रमाणेच □ानदेशातील प्रसिध्दथोर □ातीकारक व समाजसेवक माधवराव गोटू पाटील यांचे खानदेशच्या स्वातंत्र्य चळवळीत मोठे योगदान आहे.

प्रस्तावना :

माधवराव गोटू पाटील यांचा जन्म १९१० मध्ये चोपडा जि.जळगाव येथे एका शेतकरी कुटूंबात झाला.त्यांचे मराठी शिक्ष□ पाचवी पर्यत झाले.त्यांची घरची आर्थि□ परिस्थिती सामान्य असल्याने त्यांना शाळा सोडवी ला□ली व एका खाजगी कापड दुकानातते नो□रीस ला□ले.जवळपास आठ वर्ष त्यांनीही नो□री □ली.[१]

चोपडाहे गाव स्वातंत्र्य चळवळीत त्यावेळी खानदेशात आधाडीवर होते.त्यामुळेसाने गुरुजी,सेनापतीबापट, मधु लिमये, शं□रराव देव, अण्णासाहेब दास्ताने यासारखे□ांग्रेसचे वरिष्ठपुढारी याठिकाणी येत असत.त्यांच्या संपर्कात माधवराव पाटील आल्याने त्यांच्यात राष्ट्रसेवेची प्रेरणा निर्माण झाली.[२]

महात्मा गांधीजी १९२७ मध्येखादी प्रचारासाठी पूर्व खानदेशात आले असतां-ा चोपडे येथेही आलेहोते.त्यावेळी मगनलाल नगीनदास गुजराथीहेचोपडयाचेप्रमुख नेतेहोते.ते खादी प्रचार व हरिजन सेवेचे कार्य करीत असल्याने त्यांच्या प्रेरणेने माधवराव पाटील चरख्यावर सुत कातणे व हरीजनफंडास मदत म्हणुन स्वयंसेवकाचे काम करुन राष्ट्रसेवा करु ला□लेहोते.महात्मा गांधीजी चोपडयाला आले असतांना माधवराव पाटील यांचे□ार्य बधु-न त्यांनीसमाधान व्यक्त केले.त्यामुळे त्यांना खूप आनंदझाला.तेव्हापासून त्यांनी खादी वापरण्याचा निश्चय केला व तो आमरण पाळला. स्वातंत्र्यलढयात भाग घे□ाची प्रेरणा त्यांना खऱ्या अर्थाने तेव्हापासूनच झाली.[३]

१९२८ मध्ये गुजराथमध्ये बारडोलीला सरदार वल्लभभाई पटेल यांच्या नेतत्वाखाली साराबंदीचा सत्या□ह सुरु झाला. त्यावेळी माधवराव पाटील यांनी बारडोलीला सत्याग्रहात भाग घे□ासाठी निश्चय केला पण आई वडिलांनी त्यांना जाऊ न दिल्यानेते खुपच निराश झाले.[४]

महात्मा गांधीनी १९३० मध्ये सवि-नय □ायदेभं□ चळवळ सुरु केली.अतिशय आगळी वेगळी व नाविंण्यपुर्ण अशीही चळवळ होती.मीठाचा कायदा मोडुन मीठ बनवायचे, लुटायचे व विकायचे अशा स्वरुपाची ही चळवळ होती.या चळवळीचे पडसाद खानदेशातही उमटले.या सत्याग्रहात भाग घे□ासाठी पिप्राळे येथेसत्याग्रहासाठी आश्रम उघडण्यात आलाहोता.वासुदेव दास्तानेहे या आश्रमाचे प्रमुखहोते.माधवराव पाटील या आश्रमात आई वडिलांना न विचारता दाखल झाले.तेव्हा त्यांना घरी नेण्यासाठी चोपडयाहुन काका व भाऊ पिप्रांळे येथे आले. त्यावेळी या सर्वां-ी माधवरावां-ी घरी यावे म्हणुन अनेक कारणे सां□तली.दोन चार दिवस तरी घरी चल अशी विनवणी केल्यानेते धरी आले.मात्र आठ- दहा दिवस धरी थांबल्यावर त्यांनी परत आश्रमात जाण्यासाठी हट्ट धरला.तेव्हा हा ऐकणार नाही म्ह□ुन-माधवराव पाटील यांना एका खोलीतहात पाय बांधुन कोंडुन ठेवण्यात आले.आता यातुनसुटकाहोणे कठीण आहे असेसमजूनत्यांनी

शेवटी अन्न पाणी वर्ज्य केले, बोल□ही बंद □ले.शेवटी बाहेर गावच्या नातलगांनी येऊनत्यांची बंधणे सोडली व त्यांना खोली बाहेर आणले.पण त्यांच्यावर पहारा ठेवला असे आठ- दहा दिवस झाल्यावर एक दिवस ते पुन्हा कोणालाही न सांगता पिप्रांळे आश्रमात निघु-न □ले.सर्वांचाच नाइलाज झाल्यानेत्यांनी त्यांचा नादसोडला. देशभक्तीची केवढी प्रचंड उर्मी त्यांच्यात होती कि त्यांना ती स्वस्थ बसु देत नव्हती.[५]

माधवराव पाटीलपिंप्राळा शिबीरात असतांनाच विले पारले येथेसत्याग्रहींचीतुकडी पाठविण्याबद्दलचा आदेश आला.या सत्याग्रहासाठी प्राणार्पण करण्याचीतयारी असलेत्यांनीच-नावे द्यावी असे सुचविण्यात आलेहोते.माधवराव पाटील याच संधीची वाट पहातहोते.त्यांनी कोणताही विचार न करता आपले नाव नोंदविले व ते विले पारले येथीलसत्याग्रही छावणीत दाखल झाले.सं□याबला-ने मुंबईच्या पथकाखालोखाल पुर्व खानदेशचेजिल्हयाचेपथक मोठेहोते.त्यात १०३ सत्याग्रही असल्याचे आणि त्यातील प्रत्येकव्यक्ती अत्यंत □□खर असल्याचे गुप्तचरांनी लिहुन ठेवले आहे.या अपुर्व सत्याग्रहात एका पाठोपाठ दुसऱ्या पथ□ा-ने □ऱ्या सत्याग्रह प्रणालीनूसार शिस्तबध्द सत्याग्रह□रु-न □ांधीवादी नि-र्धारा-ने भया-न□ मारहा-नसह-न □ली. इतर सर्व पथके जायबंदी झाल्यावर शेवटी १५ मे रोजी पुढे आलेल्या पुर्व खानदेशच्या पथकानेसत्याग्रहाचे इतके नेत्रदिपक दर्शन घडविले कि रत्नागिरीचे जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधिक्षकही भारावु-न □ले.[६]

शिरोडयाला गेलेले जळगाव जिल्हयाचे(पुर्व खानदेश) सत्याग्रही प्रथम विले पारले छावणीत गेलेहोते.विले पारले येथे आल्यावर २०-२० तुकडया करण्यात आल्या यातील एकातुकडीचे नेतृत्व माधवराव पाटील यांच्यावर सोपविण्यात आलेहोते.या तुकडीला शिरोळा येथील मीठागरावर मीठ लुटण्यासाठी पाठविण्यात आले.जातांना प्रत्येकास एक रिकामे पोते देण्यात आलेहोते.हीसत्याग्रहीतुकडी □□□ म्हणत म्हणत माधवरावांच्या नेतृत्वाखाली मिठागराकडे निघाली.समुद्र किनाऱ्यावरील मिठागरातीलमीठ पोत्यात भरणार तोच ब्रिटीश सोल्जरांनी त्यांच्यावर□ाठयांचा मारा सुरु केला. ब्रिटीशांच्या या नि-र्दयी मारहानीत माधवरावांच्या पायाच्या व छातीच्या हाडावर मार बसला.[७] शिरोडा येथील मीठसत्याग्रहात भाग घेतल्याबद्दल त्यांना अटक करण्यात येवुन एक महिना कारावासाची शिक्षा देण्यात आली व त्यांची रवानगी रत्नागिरीच्या तुरुंगात करण्यात आली.तेथे शंकरराव देव वगैरे बरेच वरिष्ठ मंडळी त्यांच्या सोबत होती.[८]

एका महिण्याच्या तुरुंगवासानंतर माधवराव पाटील यांना कोल्हापुरला आणुनसोडून देण्यात आले.त्यानंतर□ोल्हापूरच्या कार्यकत्यांनी त्यांना पुण्याला आणुनसोडले.पुण्यात आल्यावर त्यांना सोलापुर येथे सुरु असलेल्या झेंडा सत्याग्रहाबद्दल समजल्यावर यातही आपण भाग घेतला पाहिजे असे वाटल्याने त्यांनी सोलापुरच्या दिशेने पायी प्रवास सुरु केला.सोलापुरचासत्याग्रह भयंकर होता.सत्याग्रहींचे ब्रिटीशांनी अतोनातहाल केले. बर्फावर झोपवणे, पाठीवरुन बुटावह चालणे, सिगारेटचे चटके देणे इ. भयं□र प्र□ार ब्रिटीश सोल्जर्स सत्याग्रहींवर करीतहोते.तरीही न डगमगता माधवराव पाटील यांनीसत्याग्रहात भाग घेवून बिटीशांचे अत्याचारसहन केले.

सोलापुरयेथीलसत्याग्रहींवर होणात्या अत्याचाराच्या बातम्या माधवरावाच्या घरच्यांपर्यंत पोहोचल्यावर त्यांचे कुटूंब अतिशय दु:□ी झाले व माधवरावांचे वडील व भाऊ सोलापुरला जावून त्यांनी माधवरावांचे मन वळवून घरी आणलेते चार महिण्यांनी घरी परतलेहोते. त्यामुळे घरातील सर्व कुटूबीयांना दिवाळी सणासारखा आनंद झाला.[९]

१९३२ साली गांधी आर्यविन कराराचा भंग झाला व पु-हा □ायदेभं□ चळवळ सुरु झाली.या सत्याग्रहातहीत्यांनी सक्रिय सहभा□ घेतला.१९३६ मध्ये पूर्व □ा-नदेशात फैजपुर येथे झालेल्या राष्ट्रीय कॉग्रेसच्या □डयातील पहिल्या अधिवेशनात त्यांनी स्वंयसेवक म्ह□ु-नमहत्वाची □ामे केली.त्यानंतर १९३७ मध्येते जिल्हा□ॉ□ेस□मिटीचेसेक्रेटरी झाले.[१०]

१९४० मध्ये महात्मा गांधीनीवैयक्तीक सत्याग्रह चळवळ सुरु केली.मात्र हासत्याग्रह गांधीजींनी निर्धारीत केलेल्या पध्दतीप्रमाणेच करावयाचा असल्याने कोणालाहीसत्याग्रह करण्याची परवानगी नव्हती.जिल्हा कमिटीचे चिटणीस केशव गोविंदा लेले यांच्यावर वैयक्तीक सत्याग्रहसंचलनाची जबाबदारी असल्यानेतेसत्याग्रहींची नावे महात्मा□ांधींकडे पाठवुन मान्यता मिळवित असत. या चळवळीसाठी पुर्व खानदेशातुन ५० सत्याग्रहींनासत्याग्रह करण्याचा बहुमान मिळाल. त्यात माधवराव गोटू पाटीलहे एक होते यात त्यांनीसत्याग्रह करुन कारावास भोगला.[११]

महात्मा गांधीनी १९४२ मध्ये चले जाव चळवळ सुरु □ली.हा शेवटचा निर्णायक लढाहोता.ब्रिटीशांनी ही चळवळ चिरळु-न टाकण्याच्या उद्देशा-ने □ॉ□ेसच्या वरिष्ठ नेत्यांना अटक करुन तुरुंगात टाकले.पूर्व खानदेशातही या चळवळीच्या तिव्र प्रतिक्रिया उमटल्या.चोपडे शहरातही या काळात दररोज प्रभात फेरी, मोर्चा, निषेध सभा, शाळांवर बहिष्कार या माध्यमातून चळवळ जोरात सुरु होती.त्यातच माधवराव पाटील, मगनलाल नगीनदास गुजराथी व डॉ.सदाशिव कोठारी या प्रमुख नेत्यांनासरकारने अटक करुन तुरुंगात टाकल्यामुळे आगीततेल पडल्यासारखे झाले.त्यामुळे चलेजाव चळवळ चोपडयात अधिक जोमाने पेटली.[१२]

माधवराव पाटील यांचे स्वातंत्र्य चळवळी बरोबरच समाजकारण व राजकारणातही मोठे योगदान आहे.१९४६ मध्ये निवडणूक घेण्यात आली.पूर्व खानदेश जिल्हयात विधान सभेच्या सात जागा होत्या.त्या सर्व जागांवर कॉग्रेसने आपले उमेदवार उभे केले.त्यात

माधवराव गोटू पाटील, काकासाहेब राणे, आबासाहेब देशमुख, डॉ.काकासाहेब साने, हिरालाल कल्याणी, व सितारामभाई बिर्ला हे सर्व □ॉग्रेसचे उमेदवार प्रचंड बहुमताने निवडून आले.१९६२ पर्यंत मुंबई प्रांतीक असेंब्लीच्या ज्या ज्या निवडणुका झाल्या त्यात ते कॅग्रेसकडुन निवडुन आले.१९६३ ते १९७७ असा दिर्घकाळते जिल्हा कॅग्रेस कमिटीचे अध्यक्ष होते.

स्वातंत्र्यानंतरत्यांनी सामाजिक चळवळीत स्वत:ला झो□-न दिले.त्यामुळे आपोआपचत्यांच्याकडे विविध मानाची पदे चालत आली.त्यात १९४८ मध्ये जिल्हा बॅंकेचे अध्यक्षपद, नगरदेवळा सूत गिरणीचे पंधरा वर्षे डायरेक्टर व जिल्हा दुध विकास फेडरेशनचेसात वर्ष डायरेक्टर म्हणूननिवडून आले.तसेच १९६६ ते १९७८ या काळातते महाराष्ट्र विधान सभेचे सभासद म्हणून निवडून आले.सातपुडातापीपरिसरदुधसंकलनसंस्थेचेसंस्थापक व महात्मा गांधीतालुकामहाविद्यालयीन शिक्षण मंडळाचेसंस्थाप□ व जिल्हासहकारी बोर्डार्च चार वर्ष अध्यक्ष अशा अनेक सार्वजनिक संस्थात त्यांनी सेवा केली.[१३]

१३ सप्टेंबर १९७७ रोजी मोटार अपघातात त्यांना एक पाय गमवावा लागला.तरीहीत्यांचे समाजसेवेचे कार्य थांबले नाही.१९८२ मध्येत्यांनी पु.विनोबा यांची सेवाग्राम आश्रमात भेट घेतली व १९८२ ते १९८४ या दोन वर्षात त्यांनी गीता प्रवचन सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने २५०० गीता प्रवच-नांच्या प्रती व १०००० गीताईच्या प्रतींची विक्री केली. त्यासोबतचसा-ने गुरुजींच्या श्यामची आई व इतर पुस्तकांचाहीत्यांनीप्रचार केला. जमनाबाई कुटमूटीया यांच्या नेतृत्वा□ाली झालेल्या □ावंश हत्याबंदी □ार्यक्रमातही त्यांचा सहभा□ राहिला. वयाच्या ८० व्या वर्षा-नंतरही माधवराव पाटील यांचा विनोबांची गीताई व महात्मा गांधींच्या खादी प्रचाराचा कार्यक्रम अव्याहतपणे सुरु होता.[१४]

अशा या महान स्वांतत्र्य सेनानी व समाजसेवकाचे दु:□ाद नि-धन १९९५मध्येझाले.

संदर्भ □थ :-

१ भ-नसाळी डी.एम., संयुक्त खानदेश डिरेक्टरी अर्थात खानदेशचा माहीतगार, मुंबई,१९५२, पृ.५३
२ लेले केशव गोविंद (संपादक), स्वातंत्र्य लढयातील आमचा सहभाग, जळगाव, २००२, पृ.३०५
३ पूर्वोक्त, पृ.३०६
४ पूर्वोक्त, पृ.३०७
५ चौधरी कि.का. (संपादक), महाराष्ट्र राज्य गॅझेटीअर, जळगाव जिल्हा, मुंबई, १९९४, पृ.
६ लेले □शव □ोविंद (संपाद□), स्वातंत्र्य लढयातील आमचा सहभाग, जळगाव, २००२, पृ.३०७
७ कुंटे भ.ग., स्वातंत्र्य सैनिक चरित्र कोश, महाराष्ट्र राज्य, पश्चिम महाराष्ट्र, खंड-१
मुंबई, १९७९, पृ.२६५
८ लेले केशव गोविंद (संपादक), स्वातंत्र्य लढयातील आमचा सहभाग, जळगाव, २००२,पृ.३०७
९ पूर्वोक्त, ३०८
१० भनसाडी डी.एम., संयुक्त खानदेश डिरेक्टरी अर्थात खानदेशचा माहीतगार, मुंबई,१९५२, पृ.८५
११ महाजन जे.टी. (संपादक), स्वातंत्र्य दिन, रौप्य महोत्सवी स्मरणिका, जळगाव, १९७२, पृ.
१२ संपादक, प्रताप विद्या मंदिर, सुवर्ण महोत्सव स्मृती ग्रंथ, चोपडा, १९६८, पृ.२७
१३ लेले केशव गोविंद (संपादक), स्वातंत्र्य लढयातील आमचा सहभाग, जळगाव, २००२, पृ.३०८
१४ पूर्वोक्त, पृ.३०९